**महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या.पुणे (मेस्को)**

दुसरा मजला रायगड इमारत घोरपडी,पुणे-४११००१.
संपर्क : ०२०-२६२०२६५९, मो.नं.-९३७३१६४९६२
इमल: CONTACT@MESCOLID.CO.IN

दिनांक :-27/11/2024

जा.क्र.मेस्को/भरती/CA/001/2024

**विषय:- सनदी लेखापाल या पदाचे काम करण्यासाठी आपली दरपत्रके सादर करण्याबाबत.**

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, घोरपडी, पुणे हि संस्था कंपनी कायदा १९५६, आणि सुधारित कंपनी कायदा २०१३ नसार नोंदणीकृत आहे. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, घोरपडी, पुणे हि संस्था हा जरी महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय असला तरी कंपनी कायदा लागू होत असल्यामुळे कंपनी कायदा २०१२ नुसार महामंडळातील सर्व आर्थिक व्यवहार पहाणे,वार्षिक लेखे तयार करणे व यंणा-या अडचणींची पर्तता करणे आवश्यक आह. तरी कंपनी कायदद्याच्या लागू होणा-या तरतुदी त्यानुसार करावयाची पूर्तता आणि वेळोवेळी लागणारा सल्ला यासाठी सल्लागार सनदी लेखापाल यांची नेमणुक करावयाची आहे. तरी, महामंडळातील करावयाच्या कामाचे स्वरुप (Scope of Work) यांचा मानधनाचा तपशिल (रेटिनेरशिप फीस), टॅक्सेस हे नमूद असलेला प्रस्ताव (Proposal) हे महाराष्ट्र माजी सैनिक कल्याण महामंडळ घोरपडी, पुणे येथे रजिस्टर पोस्टाद्वारे किंवा समक्ष बंद पाकिटात आणून द्यावीत. स्कोप ऑफ सर्व्हिस साठी वेगळी लिस्ट या पत्राला लावण्यात आली आहे.
उपरोक्त प्रस्तावाबरोबर खालील गोष्टींची पूर्तता असणे आणि तशी कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.

१. अपेक्षित मानधनाचा तपशील (रेटिनेरशिप फीस ) (मासिक व वार्षिक).
२. सर्टिफीकेट ऑफ प्रकटीसचे प्रमाणपत्र.
३. सनदी लेखापाल हा The Institute of Chartered Accountant या संस्थेची पदवी प्रमाणपत्र.
४. पार्टनर्स फर्मचे प्रोफाईल.
५. फर्म किंवा फर्मचा सिनियर पार्टनर १० वर्ष प्रॅक्टिसमध्ये असल्याचे डिक्लरेशन.
६. फर्म चे पॅन कार्डची प्रत
७. फर्म चे जी.एस.टी.चे प्रमाणपत्राची प्रत.
८. काम केलेल्या मेजर क्लायंट आणि तो क्लायंट किती काळापासन फर्म बरोबर संलग्न आहे याचा पिरियड याची यादी
९. वर नमूद केल्याप्रमाणे लेटर हेड वर प्रिंट असलेला सही शिक्यासोबत सादर केलेला प्रस्ताव, दरपत्रक आणि कामाची व्याप्ती (स्कोप).

वरील सर्व कागदपत्रे स्वसांक्षाकित करुन द्यावीत, उमेदवाराने सादर केलेल्या कागदपत्रावरुन त्यांचा अनुभव व कामाचा स्कोप या सर्व बाबींचा विचार करुन महामंडळातील आर्थिक विषयानुसार त्यांना नियुक्ती दिली जाईल. सनदी लेखापाल यांना आर्थिक विषयानुसार काम वाटप करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना रहातील.
वरील सर्व कागदपत्रे कंपनीच्या ऑफिस मध्ये बंद पाकिटात रजिस्टर पोस्टाने किंवा समक्ष दि ०३/१२/२०२४ पर्यंत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित (मेस्को), रायगड बिल्डींग, नॅशनल वॉर मेमोरियल,घोरपडी, पुणे-४११००१ येथे कार्यालयीन वेळेत कार्यालयात पाहोचविणे आवश्यक आहे. दि.०३/१२/२०२४ नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तांवाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी. कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जांबाबत छाननी करुन पात्र फर्मला मुलाखतीसाठी वेगळे बोलवले जाईल नियुक्ती देणे किवा नाकारण्याबाबतचे सर्व अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांनी राखून ठेवले आहेत.

मा. व्यवस्थापकीय संचालक
यांचीस्वाक्षरी असे

**सनदी लेखापाल (C.A. )यांनी महामंडळाची करावयाची कामे (Scope of Work)**

1. मासिक GST रिटर्नची शुद्धता तपासणे

2. जीएसटी विभागाने वेळोवेळी सादर केलेल्या अद्यतन माहिती या कार्यालयाच्या निदर्शनास आणून देणे व मेस्कोच्या कार्यभारात त्याची अंमलबजावणी करण्यास कर्मचाऱ्यांना मदत करणे.

3. कर्मचाऱ्यांच्या जीएसटीशी संबंधित कोणत्याही प्रश्नांचे निराकरण करणे.

4. MESCO च्या क्लायंट/प्रॉस्पेक्ट क्लायंटसह जीएसटीशी संबंधित कोणत्याही प्रकरणाचे निराकरण करणे.

5.मेस्कोला जीएसटी विभाग मर्फत विचारणा केलेल्या पत्रास उत्तर देण्यासाठी मदत करणे.

6. सरकारकडून होणाऱ्या जीएसटी ऑडिट दरम्यान सहाय्य करणे.

7. आवश्यकतेनुसार जीएसटीशी संबंधित इतर कोणत्याही बाबी.

8. मॅस्कॉद्व्यारे कपात केलेल्या आयकरावरील TDS ची शुद्धता तपासणे.

9. TDS अनुपालन अपडेट करणे.